महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस अधीक्षक कार्यालय,वाशिम.**
काटा रोड सिव्हील लाईन वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-234834
ईमेल: - sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक.१५.०१.२०२२

## अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ ची कठोर अंमलबजावणी करणार

मा.अपर पोलीस महासंचालक श्री विनय कारगांवकर ना. ह. सं. महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी काल दिनांक १४.०१.२०२२ रोजी अनुसुचित जाती जमाती कायदा १९८९ व सामाजिक बहिष्कार कायदा २०१६ या कायदयाचे मार्गदर्शनाकरीता व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर ऑनलाईन कार्याशाळेकरीता संबधीत विभागाचे सर्व वरिष्ठ अधिकारी हजर होते.

आज दिनांक १५.०१.२०२२ रोजी पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंह (IPS) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे सभेचे आयोजन करण्यात आले असुन या गुन्हे सभेकरीता सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणेदार वाशिम जिल्हा हजर असुन या सभे मध्ये अनुसुचित जाती जमाती कायदा १९८९ व सामाजिक बहिष्कार कायदा २०१६ चे प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने सुचना देण्यात आल्या. तसेच वाशिम जिल्यातील एकुण ४० गुन्हे प्रलंबित असुन नमुद सर्व प्रलंबित गुन्हयाचा आढावा घेण्यात आला आहे. त्यापैकी एकुण १४ गुन्हे मा. उच्च न्यायालय नागपुर यांचे आदेशाने स्थगीत असल्याने नमुद प्रलंबित गुन्हयाचा तपास पुर्ण करून त्याबाबत मा. उच्च न्यायालय नागपुर येथे शपथपत्र दाखल करून गुन्हयाचे दोषारोप पत्र मा न्यायालयात दाखल करण्याची परवानगी घेण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहे. तसेच १० गुन्हयाचा तपास हा प्रगतीपथावर असुन ६० दिवसापेक्षा कमी दिवस झालेले आहेत. तसेच सर्व गुन्हयाचा तपास मुदतीत ६० दिवसात पुर्ण करून मा न्यायालयात दाखल करणे व ज्या गुन्हयांचा तपास ६० दिवसामध्ये पुर्ण होत नसेल त्याबाबत मा. न्यायालय व वरिष्ठ अधिकारी यांना त्याबाबत अहवाल सादर करणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

अनुसुचित जाती जमाती कायदा १९८९ व सामाजिक बहिष्कार कायदा २०१६ या कायदयाच्या गुन्हयातील व इतर गुन्हयाचा तपास करतांना बारकाईने तपास करून त्यामध्ये शास्त्रोक्त तपास करणे, डिजीटल पुरावे (व्हिडीओ, सिसीटिव्ही फुटेज इ.) हस्तगत करून उत्कृष्ठ तपास करून दोषारोप पत्र मा न्यायालयात वेळेत दाखल करून दोषसिध्दीचे प्रमाण वाढविणे बाबत प्रयत्न करणे तसेच यापुर्वी निर्दोष सुटलेल्या प्रकरणाचा बारकाईन अभ्यास करून तसेच निर्दोष सुटण्याची कारणमिमांसा करून यापुढे तपासामध्ये अशा प्रकारच्या त्रुटया राहणार नाहीत याबाबत या आढावा बैठकीत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच सभे मध्ये वाशिम जिल्हयातील सर्व संवेदनशिल गावे, जातीय गुन्हे दाखल होण्याची पार्श्वभुमी असलेल्या गावातील सध्याची सामाजिक परिस्थीती तसेच गावातील इतर समस्या बाबत सुध्दा आढावा घेण्यात आला आहे.

आजच्या गुन्हेसभे दरम्यान वाशिम जिल्हयातील मागील महीण्यात दाखल गंभीर गुन्हे उघडकीस आणुन उत्कृष्ठ तपास करणारे एकुण ०९ अधिकारी व २८ अंमलदार यांचा मा पोलीस अधिक्षक श्री बच्चन सिंह (IPS) यांचे हस्ते सत्कार करण्यात आला असुन पुढील कार्यास शुभेच्छा देवुन उत्कृष्ठ कामाकरीता प्रोत्साहन देण्यात आले.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय
वाशिम